**L. A. BILL No. XIV OF 2023.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS (REGULATION OF ADMISSION AND FEES) ACT, 2015.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.**

**महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१५ चा महा. २८. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, याच्या कलम ११ मधील,- २०१५ चा महा. २८.

(१) पोट-कलम (३) मध्ये,-

(क) खंड (ग) व (घ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील:-

| | |
|---|---|
| " (ग) दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेचे सदस्य असलेले असे दोन नामांकित सनदी लेखापाल | सदस्य |
| (घ) दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय व्यय आणि परिव्यय लेखा संस्थेचे सदस्य असलेले असे दोन नामांकित परिव्यय लेखापाल किंवा प्रख्यात अर्थतज्ज्ञ | सदस्य;" |

(ख) खंड (च) वगळण्यात येईल;

(ग) खंड (ज) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील:—

| | |
|---|---|
| " (ज-१) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण | सदस्य; |
| (ज-२) संचालक, आयुष, महाराष्ट्र राज्य | सदस्य" ; |

(घ) खंड (त्र) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

| | |
|---|---|
| " (त्र) सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल असा राज्य शासनाचा अधिकारी. | सदस्य सचिव." ; |

(२) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :-

“(४क) अध्यक्षास, महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही विद्यपीठाच्या कुलसचिवास, जेव्हा, त्या विद्यापीठाच्या व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संबंधित शुल्क नियामक प्राधिकरणाचे कामकाज करावयाचे असेल तेव्हा, निमंत्रित सदस्य म्हणून निमंत्रित करता येईल.

(४ख) अध्यक्षास, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, वैद्यकीय व आरोग्य विज्ञान, वास्तुशास्त्र, कृषी, आयुर्वेद, औषधवैद्यकशास्त्र, समचिकित्साशास्त्र (होमिओपॅथी), दंतवैद्यकशास्त्र, परिचर्या किंवा औषधनिर्माणशास्त्र शिक्षण क्षेत्रातील कोणत्याही व्यक्तींना किंवा अधिकाऱ्यांना देखील, त्यांचे तज्ञ मत घेण्यासाठी निमंत्रित करता येईल. अशा तज्ञ निमंत्रितांना शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकांच्या कामकाजामध्ये सहभागी होता येईल, परंतु त्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.” ;

(३) पोट-कलम (५) मधील, “सदस्य” या मजकुराऐवजी, “सदस्य किंवा तज्ञ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ३०१२-२ (१००—३-२०२३)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

[ **सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.**]

[ **महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**]

[**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.]

**[विधानसभेने दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई